



म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २६२३

# घर माणसांचे

माधवी देसाई



REFBK-0026430
REFBK-0026430

संदर्भ
काव्य
२८२३
२८४३०
१८।११।८१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

२८२३
२८४३०
१८।११।८१

# घर माणसांचे

( काव्यसंग्रह )

माधवी देसाई

REFBK-0026430

REFBK-0026430

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०

प्रकाशक

अनिलकुमार मेहता
मेहता पब्लिशिंग हाऊस
१२१६, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

मुद्रक

हरीश विनायक चौधरी
अंजीश कमर्शियल आर्ट प्रिंटर्स
६६९ ई, शाहूपुरी ३ री गल्ली
कोल्हापूर ४१६ ००१

© माधवी देसाई
सुभाष मार्केट, हिंदवाडी
बेळगाव, ५९० ०११

फेब्रुवारी, १९९१

किमत २० रुपये

ISBN 81-7161-117-6

अनसूरकर गल्ली, बेळगावमधील

**सौ. सुधाताई व श्री. राजाभाऊ मराठे**

**– मराठे परिवार**

यांच्या सतत हसणाऱ्या घरास

**' घर माणसांचे '**

**– माधवी देसाई**

## मनोगत

जन्माला आल्यापासून माणूस घरात राहत असतो. घर बांधण्याची कला अवगत नव्हती तेव्हा तो डोंगर–गुंफेत, झाडाच्या ढोलीचा आसरा घेऊन राहत असे आणि मनुष्यस्वभावानुसार सहवासाने माणसाला त्या जागेचा लळा लागत जातो. चौदा वर्षे वनवास भोगून अयोध्येला परत जातानासुद्धा प्रभू रामचंद्र–सीतामाईना पंचवटी, चित्रकूट, दंडकारण्यामधल्या वास्तव्याच्या ठिकाणांबद्दल वाटणारे ममत्व व्यक्त झाले आहे. ' ते ही नो दिवसा गतः । '

अशी त्या दिवसांची आठवण, त्यानंतरही त्यांनी जपली आहे. आपण अनेक घरांत राहतो, अनेक घरे बदलली जातात, त्या त्या वास्तूशी आपण नकळत एकरूप झालेले असतो.

' मला माझ्या घराशिवाय चैन पडत नाही. किंवा
' Home Sweet Home. '

असे आपण म्हणतो याचे कारण नेमके हेच असावे. घरात लग्नसमारंभ असतो. घराला आपण तेव्हा रंगरंगोटी करतो, सजवतो, तोरण बांधतो. घर कसे प्रसन्न वाटते. अचानक पुढे कधी जरी घरावर संकट येते, क्वचित मृत्यू हादरा देऊन जातो. कधी प्रचंड भांडणे, विस्फोट, कलह यांनी घर दुभंगून जाते. काही काळ निघून जातो. काळ धावत असतो. कालानुरूप घरामधली माणसे स्वतःला सावरतात, बदलून

जातात. घरात जन्माला आलेली कन्या, घराच्या अंगाखांद्यावर खेळत मोठी होते. सासरी निघून जाते. घरात जन्मलेला मुलगा मोठा होतो. नोकरीनिमित्त दूर जातो. घराला विसरतो.

‘ तू आलास, घर कसं भरल्यासारखं वाटलं किंवा तू गेलास, घर कसं मोकळं मोकळं वाटलं. ’

असं घरामधली माणसे एकमेकांना म्हणतात. काल प्रेमाने नांदणारी माणसे, आज कुठल्या कुठे दुरावून हरवून जातात. घराकडे परतण्याची वाट कठोर मनाने बंद करून, नवे घरही उभारतात. माणसाच्या मनाचा गुंता माणूसच जाणे. पण या साऱ्या अवस्था बघणारे घर, जे तिथेच उभे असते; त्या घराला त्या त्या वेळी नेमके काय वाटत असेल ?

आई, वडील, भावंडे, पती, पत्नी, मुले, स्नेही यांसोबतीने जगणाऱ्या माणसांच्या सोबत सतत एक घर असते. तो हसला, तर घर हसते. तो दुःखी तर घर दुःखी. तर अशा ‘ माणसांच्या घरा ’चे हे दीर्घकाव्य आज मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे यांच्यातर्फे प्रकाशित होत आहे.

माझ्या जीवनाच्या वाटचालीत मी अनेक घरांमधून वास्तव्य केले. आज ती सारी घरे दुरावली. मी सर्वप्रथम गृहिणी आहे. घर प्रसन्न असावे; स्वच्छ, नीटनेटके असावे; त्याची मांडणी कलात्मक असावी ही माझी धडपड असते. मी राहिले त्या प्रत्येक घरावर मी प्रचंड प्रेम केलं. त्याला मलिन, अस्वच्छ होऊ दिलं नाही – आणि घरानेही तेवढाच मला दिलासा दिला. घरामधली माणसे बदलली; पण त्या त्या वेळी घरानेच मला धीर दिला. जपले. त्या दुरावलेल्या घरांची आठवण आली की वाटतं, त्या घरांचे चेहरे आज केविलपणे झाले आहेत. बेळगावचं घर नेहमी भरलेलं वाटतं. घरात मी एकटीच, पण आठवणी मात्र जागोजागी ! आणि मला वाटतं, ही माझी एकटीचीच अवस्था नव्हे, तर अनेक जणांनी, नव्हे, प्रत्येकानेच ही अवस्था कधी ना कधी भोगलेली आहे. घर बोलत नसतं. त्याला हात, कान, डोळे,

ओठ नसतात; पण हे सारं नसणारं घर मात्र अबोलपणे माणसाला जपत असतं.

‘ परिस्थितीशी घट्ट जखडलेल्या माणसांना,
जपत असतं घर !
न चुकणाऱ्या त्यांच्या प्राक्तनासाठी
मनातून हुरहुरत असतं फक्त घर ! ’

या दीर्घकाव्याच्या पहिल्या भागात माणसाच्या घराबद्दलच्या भावना व्यक्त केल्या आहेत. जोपर्यंत त्या घराचे छप्पर माथ्यावर असते, तोवर माणूस निर्धास्त असतो, तोवर त्या घराची त्याला किंमत समजलेलीच नसते. फार पूर्वी ‘ रँडम हार्वेस्ट ’ नावाचा इंग्रजी चित्रपट पाहिलेला आठवतो. चित्रपटाच्या नायकाची स्मृती हरवलेली असते. अनेक डॉक्टरी उपायांनीही ती परत येत नसते. त्याच्या छोटेखानी बंगल्याचे गेट उघडताना, बंद होताना एक विशिष्ट आवाज होत असतो. त्या गेटपाशी व त्या आवाजाशीच त्याच्या जीवनाचे अनेक प्रसंग घट्ट जखडलेले असतात. शेवटी त्या गेटपाशी त्याला आणले जाते. तो विशिष्ट आवाज ऐकू आल्यानंतर नायकाची स्मृती परत येते आणि गेटच्या आतमधले घर – जे विस्मृतीत गेलेले होते ते – नायकाला परत भेटते. इतका माणूस घराच्या कानाकोपऱ्याच्या स्मृती नकळत मनातून जपत असतो. न बोलणारे घर माणसाच्या जीवनाला संपूर्ण व्यापून गेलेले असते, हे माणसाला त्याचे घर हरवल्यावर लक्षात येते.

या दीर्घ काव्याचा दुसरा भाग आहे ‘ घर तुळशीचे. ’ पर्यायाने ‘ स्त्री ’चे घर.

माहेरच्या अंगणात, कोवळी स्वप्ने नजरेत साठवणारी तुळस, सासरच्या अंगणात पाठवली जाते आणि तिच्या लक्षात येते की,

तुझा तर राणी घातच झाला होता
राजकुमार कुणी शोधलाच नव्हता
समोरच्या कठोर प्राक्तनाशी
तुझा डाव मांडला होता

मनातल्या स्वप्नांची राखरांगोळी झाली, तरी मंजिरी शेल्याला ठिगळे जोडत जोडत, त्याच घरात आता तिचं जगणं, किंवा मरणं आहे हे अटळ सत्य तुळशीला उमगतं. मेंदीच्या पानावरचं, नखाएवढं स्वप्न आणि त्या स्वप्नाला पडलेला नागाचा विळखा ! ज्या घराला अंगण नाही, परसदार नाही, ज्या माणसांना दया नाही, माया नाही, त्या घराला आपलं मानायचं असतं.

'तुझे मुळी स्वतःचे घरच नसते
तरी उंबरठा, चौकट तू जपायची असते
धुणी, भांडी, दळण, कांडण
साऱ्यांनी तुझेच घातलेले असते.'

हे सारं तिनं करायचं असतं. घेतला वसा पाळायचा असतो. उतायचं नसतं, मातायचं नसतं; कारण ती असते सीता, द्रौपदी, तारामती ...

'वनवास तेवढाच नशिबी होता,
राजप्रासाद कधी भेटलाच नव्हता.'

तुळशीला आता वास्तवाचे भान येते. स्वप्निल अवस्था गळून पडते. मंजिऱ्या झडून तुळशीची काठी होते. आभाळाला माथा टेकवून तुळस विचार करते. सभोवती पाहते.

तिला दिसतात रक्तमाखली पावलं घेऊन चालणारी, धावणारी तिच्यासारखीच हजारो धगधगती पलाशफुले; भिंतीशी, प्राक्तनाशी टक्कर देणाऱ्या कवितांच्या भळभळत्या वेदना. अनेक पोरी, प्रौढा, किशोरी – शिळा होऊन पडलेल्या उःशापाची वाट बघणाऱ्या, तिच्यासारख्याच अनेक तुळशी अंगाखांद्यावर स्वप्नांची कलेवरं बाळगणाऱ्या, मनातल्या जिप्सीला मनातच ठेवणाऱ्या. त्या कळवळ्यातच ती बोलू लागते. स्वतःशीच –

'स्त्री जातीची रीत अशी का असावी ?
जात्यावरच्या दळणात, तीच भरडून जावी ?
या जगाची रीत कशी उफराटी !
काल होते तुळशी ! आज कोरांटी ?

तुळशीचं स्वप्न अगदी साधं होतं. गजऱ्यांच्या डावात तिला रंगायचं होतं. कवितांच्या भिंतींचं, ढगांच्या गाद्या, उशांचं घर तिला हवं होतं. झोपाळ्यावर झुलायचं होतं.

'हे सारं असंच का असायचं ?
जग हसताना, मी का रडायचं ?
छिन्न, भिन्न काळोखातले –
अनेक प्रश्न नागासारखे !

तिच्या समोर उभे असतात अन् अचानक मातृत्वाची चाहूल लागते.

'लाल, तांबूस पानांचे
इवलेसे रोप नाजूकसे हसते
त्याला बघून तुळशी खुळावते
किती वर्षांनी, किती युगांनी !'

आणि तुळसकाठी पुन्हा पाझरते. मुळाजवळची तडकलेली माती सैलावते. यानंतर प्रत्येक क्षणी तुळशी सावध असते. रोपासाठी जगण्याला अर्थ येतो. रोपाच्या ओल्या स्पर्शाने पुन्हा तिच्या जीवनात गाणी फुलतात.

'काचा पाण्यांची, झिम्माफुगडीची, झोपाळ्याची,
मनातून, तनातून गाणीच गाणी. आभाळधुनीची ।'

यानंतर तुळशी जगणार असते रोपासाठी. त्या इवल्या रोपाची शोकान्तिका होऊ देणार नसते.

'माझा तरी राणी, चिखलच झाला
कोणताही आकार, हाती नाही आला
मी भोगेन सारा सासुरवास
तुझ्या सुखासाठी !'

स्त्री प्रचंड वेदना पचवून उभी असते आणि ती उभी असते, म्हणून संसार उभे असतात. ही वेदना पचविण्याची ताकद येते कुठून ? तर कधी तरी एका दिव्य प्रीतिक्षणाचा साक्षात्कार माणसांच्या अंतर्मनाला झालेला असतो. त्याच्या बळावर माणूस जगतो. तो क्षण सफल झाला

नसेल कदाचित. मनातले ते स्वप्न उमलण्याआधीच कोमेजले असेलही, पण तो उत्कट अनुभवच दुसऱ्याचे स्वप्न जपण्याची दृष्टी देतो. 'माझी शोकान्तिका हिच्या वाटणीला नको,' असे म्हणत स्त्री वेदना भोगत असते.

'तिला स्वत:चंच कोडं पडतं
मरता मरता, माणूस का जगतं?
भोगवटे भोगूनसुद्धा माणूस –
जिवंत मरण कसं सोसतं?'

याचं उत्तर तिला सापडतं –

मी तुळशी धरतीची कन्या
तापून, झोडपून, तडकून, सुकून
पुन्हा पुन्हा जळणारी, फुलणारी
रोपासाठी

हजारो तुळशी अशाच फुलतील,
बदलत्या युगाची वाट बघत
एखाद्या रोपाचा वृक्ष होईल
पोलादी, कणखर!
एखादी तुळशी आकार घेईल
विश्वव्यापी!

आणि या विश्वासावर, तुळशीचे, पर्यायाने स्त्रीचे म्हणजेच माणसाचे घर उभे राहते. स्वतः प्रचंड सासुरवास व भग्न मनोरथांचे शल्य भोगलेली एका पिढीमधली स्त्री, पिढी घरात वाढणाऱ्या नव्या पिढीमधल्या स्त्रीला मग समजावून घेते. अनेक कुटुंबांमध्ये, आई, मुलगी, सासू, सून, नणंदा, भावजया किंवा जावा जावा एकमेकींना समजून घेताना आढळतात, तेव्हा समाधान वाटते. स्त्रीने स्त्रीला समजावून घेणे ही अत्यंत महत्त्वाची व गरजेची गोष्ट आहे. स्त्री जन्माची अर्धी दु:खे या समजून घेण्याने कमी होतील असा मला विश्वास आहे. आपला भोगवटा इतरांना भोगावा लागू नये इतकं जरी माणसाला मनापासून वाटलं, तरी खूपच आहे, असं मला वाटतं.

तर असं हे मी पाहिलेलं, अनुभवलेलं ' घर माणसांचे. '

मी विश्वासानं हा काव्यसंग्रह मेहता प्रकाशनाच्या हाती सुपूर्त करते आहे. आजवरच्या त्यांच्या प्रथेनुसार हे प्रकाशनही दर्जेदार असणारच ही मला खात्री आहे. जे वाचक उत्सुकतेने माझ्या लेखनाची वाट पाहत आहेत, त्यांच्या विश्वासास ' घर माणसांचे ' पात्र ठरावे ही सदिच्छा. धन्यवाद !

सुभाष मार्केट, हिंदवाडी,
बेळगाव ५९० ०११

माधवी देसाई

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२६२३
ग्रा. क्र. २६४३०
९५५९७
संदर्भ शाखा (स्थायी प्रत)

## भाग पहिला

# घर माणसांचे

खोपा उसवला तरी चिमणी बिचारी,
काडी काडी जोडताना, गुणगुणत असते
दूर गेलेल्या चिमण्याला सादवताना –
घराच्या भिंती उभारत असते ॥१॥

माझ्या मोकळ्या घरात बसून
मी बघत असते, दारातून घरात येणारा
भन्नाट वारा, गवत–काडी, चिमणी
आणि माझ्या घराने दिलेला सहारा ॥२॥

तू निघून गेलास अन् –
घराचं दार मोकळंच राहिलं –
खुळ्या शब्दांचं अन् बावऱ्या प्रीतीचं
कवाड उगीच धडधडत राहिलं ॥३॥

उघडा दरवाजा उगीच मागे–पुढे
वाऱ्यासोबत हेलकावणारा
तुझ्या प्रतीक्षेत माझ्यासह
आतमधून झेलपाटणारा ॥४॥

माणसं घरापासून दूर जातात
घराचं छप्पर, भिंती, कवाडं
सारं काही तिथंच राहतं
माणसांसाठी रिकामं घर उसासत राहतं ।।५।।

भिंतीवरच्या पाली अवेळी चुकचुकायच्या,
तेव्हा माझ्या आधी घर धास्तावायचं
उद्या येणाऱ्या अशुभाच्या भीतीनं,
मनातल्या मनात शहारायचं ।।६।।

घरातल्या माणसांनी गायलेल्या स्वरांचे सूर
भिंती भिंतींवर तटस्थ, व्याकुळ
दिवाणे होऊन अवचित ओघळतात
रांगोळीचा न् आसवांचा चिखल कालवतात ।।७।।

घराच्या काना-कोपऱ्यांनी ऐकलेले
माणसांचे शब्द, आणाभाका, आश्वासने
साऱ्या घरात इथे तिथे सादवत असतात
पांढऱ्या फिकट भिंती मौन पांघरतात ।। ८ ।।

घराच्या प्रत्येक भिंतीवर, खिळ्यामोळ्यांवर,
एक एक आठवण लटकत असते
अवचित पागोळीतून टपटपते तेव्हा,
बैरागी घर कसनुसे होते ।।९।।

दोन हातांनी गुंफलेला गजरा
चुरगाळलेल्या पाकळ्यांचा प्रणयी गंध
साऱ्या घरात भरून उरलेला असतो
प्रत्येक श्वासातून घराने जपलेला असतो ।।१०।।

जेव्हा घरातली माणसे बिथरतात
एकमेकांना दुरावतात, तेव्हा घराने जपलेला
तो श्वासातला प्रणयी गंध
घर जगण्याला पुरेसा असतो ।।११।।

माणसांनी भोगलेले अन् फेकलेले
चिन्मयी, उत्कट क्षण
या घराने टिपलेले असतात
त्या क्षणांच्या बळावर भिंती उभ्या असतात ।।१२।।

या मोकळ्या घरातून फिरताना –
एक अबोल अस्तित्व आगेमागे जाणवते
चकव्यात मन भय व्याकुळते,
तेव्हा घर फिकट हसते ॥१३॥

घरामधल्या माणसांनी पाहिलेली स्वप्नं जोपासत
एक एक कोपरा निस्तब्ध असतो
एका हळव्या क्षणी मात्र
उरी फुटून, सैरभैर होतो ॥१४॥

कधीतरी उदास विराणी गाताना,
घर सुरात सूर मिसळते.
डोळ्यांतून पाझरणाऱ्या पुराला
आपल्या परीने बांध घालते ॥१५॥

घरावर आलेली वादळे, पूर
माणसाआधी घराने झेलले होते
केविलवाण्या भिंती ढासळण्याआधी
कठोर वास्तवाशी दोन हातही केले होते ॥१६॥

घरात येणारा–जाणारा प्रत्येक जुना-नवा जीव
घराच्या जीवापलीकडला असतो.
माणसं माणसावर उलटताना –
प्रत्येक घाव घराने जिव्हारी घेतलेला असतो ॥१७॥

माणसांमधले उसवत गेलेले प्रीतीचे धागे बघताना
घर कमालीचं उदास होतं
फिक्या पांढऱ्या भिंतीसोबत –
डोळे मिटून उगीच स्तब्ध होतं ॥१८॥

घराला समजतच नसतात रुसवे, दुरावे
घर बिचारं ! घरच असतं
भिंतीवरचं छप्पर सावरणं,
अन् सावली देणं इतकंच त्याला माहीत असतं ॥१९॥

तू मारलेल्या हाका अन् माझी उत्तरे
नारळीच्या माथ्याने जपलेली असतात
सांजकळी उमलताना, अंगणात उतरतात,
तेव्हा घराचे डोळे भरून येतात ॥२०॥



...२

घराच्या काळजातल्या गंधित पाण्याने
मी पुन्हा शिंपलीय जाई, जुई, सायली,
गंधभारली फुले बघून मी हरखते,
तेव्हा पाठीमागून घर समाधानी हसते ॥२१॥

घराजवळच्या निळ्या पाण्यातले,
तुझे निश्चल प्रतिबिंब मला रडवते
फुंकर घालून, प्रतिबिंब सजीव करणारे
खट्याळ घर, छुपे छुपे होते ॥२२॥

आभाळात लाख लाख नक्षत्रे फुलतात,
झोपलेल्या स्वप्नांना जागी करतात
रित्या गंधालीचे बांध कोसळून,
घराच्या कुशीत हुंदके लपतात ॥२३॥

पूर्ण चंद्र आभाळात येतो,
घरादारांवर चांदणे माखतो
रसिक मनाचे घर – तुझ्याविना –
– माझ्यासाठी – जोगी बनतं ॥२४॥

असं तुझं माझं एकरूप घर,
विसकटलं म्हणावं कसं ?
चारी बाजूंनी उभ्या घराला,
भग्न म्हणावं कसं ? ।।२५।।

असेल बिचारं विटा–काचांचं, दगड–गोटयांचं
निर्जीव, देखणं चित्र !
माणसा–माणसांच्या ताटातुटी होतात, तेव्हा –
घरच फक्त रडत राहतं ।।२६।।

हे घर तर आहे चिरंतन प्रीतीचं,
प्रीतीच्या भोगवटयांच्या साक्षीचं,
माणसासोबत हसणाऱ्या, रडणाऱ्या,
उदासणाऱ्या, कणा–क्षणांचं ।।२७।।

माणसानं सारं विसरावं,
पण घर विसरू नये.
माणसानं सारं हरवावं,
पण घर हरवू नये ।।२८।।

घराकडे नेणारी वाट नजरेसमोर असते
तोवर चालण्याला एक दिशा असते
घराची दिशा हरवते,
तेव्हा वाटा दिशाहीन होतात ॥२९॥

आपणच उभारलेल्या घराला,
असं बेवारशी करू नये
आपल्या मायेत त्याला गुंतवून,
आपण कोरडं होऊ नये ॥३०॥

कुणीच नसतं सोबतीला तेव्हा,
घर साथ, सोबत देतं,
कुणीच नसतं अश्रू पुसायला,
तेव्हा भरल्या डोळ्याने न्याहाळत राहतं ॥३१॥

घराच्या भिंतींना डोळे असतात
त्याच्या काळजात आपले हुंदके असतात
माणूस माणसाला दुरावतो तसं घर कातर कातर होतं
माझ्यासारखंच आतल्या आत झुरमुरत राहतं ॥३२॥

अशा या घरात तुझ्याविना मी राहते
घराच्या सोबतीनं व्यथा शिवत जाते
माझ्या उसवलेल्या घरातच चिमणी खोपा बांधत असते,
हातातल्या आरशात जगाचे प्रतिबिंब उमटते ।।३३।।

या घराचे मग देऊळच होते
मौनाचे त्याला कळस बांधते
आठवणींचे झुंबर लखलखते
तेव्हा घर कसे संन्यस्त होते ।।३४।।

साऱ्या आठवणींचे बोझे घरभर – पसरलेले,
चालताना अवघडच करतात,
अलवार, त्यांना बाजूला सारून
घर तेव्हा चालायला शिकवतं ।।३५।।

एक अपघाती वळण चुकवताना,
जीवन एक वेगळा वळसा घेते अन्
जुळालेले नाते वेगळ्या वळणाला का लागते
हे घरालाच फक्त माहिती असते ।।३६।।

जीवनाच्या नजरेसमोर कोणतेच वळण नसते,
किनाऱ्याशी साठलेल्या, लव्हाळ्यात जखडलेल्या,
घरातून फेकलेल्या अश्राप जीवाला
घरानेच फक्त समजावून घेतलेले असते ॥३७॥

परिस्थितीशी घट्ट जखडलेल्या माणसांना
जपत असतं – घर !
न चुकणाऱ्या त्यांच्या प्राक्तनासाठी
मनातून हुरहुरत असतं, फक्त घर ! ॥३८॥

प्रीतीची गीते वाऱ्यात पसरतात,
घरातली माणसे माळभर पांगतात –
सैरभैर, दिशाहीन माणसांची
वाट बघत असतं घर ! ॥३९॥

माणसाने आभाळभर फिरावे,
वासरागत रानोमाळ व्हावे
पण शेवटी घर शोधत यावे,
घरासाठी, स्वतःसाठी ॥४०॥

परदेशी माणसाचं घर,
कुलुप राखतं –
त्या एवढ्याशा कुलपात
जीव मुठीत धरून घर वाट बघतं ।।४१।।

घराची माया आभाळासारखी
उंच नारळामधल्या पाण्यासारखी,
घरातला ' घ ' प्रथम गिरवूनसुद्धा माणूस –
घर विसरतो, तेव्हा घर थक्क होतं ।।४२।।

सर्वांनाच एक घर असतं
त्या घरासाठीच तर वणवणणं असतं,
पण घर उभारलं की माणूस विसरतो
माणसांना, स्वत:ला, घराला ।।४३।।

कधी कधी घर अर्थहीन वाटतं
अन् ओढाळ मन बाहेर धावतं –
उशीरा का असेना, पक्षी झेपावणारच, फांदीवर
हे घरानं अनुभवलेलं असतं ।।४४।।

मग ते एकटचा वनवासी जीवाला जपतं
तिच्या जीवीचं जिवलग बनतं
चारी हातांनी तिला गोंजारत
डोळचांनी प्रतीक्षा करतं, तिच्या – स्वतःच्या ॥४५॥

काकड आरतीला घराचं देऊळ होतं
सांजवातीला घर ध्यानस्थ बनतं
मध्यरात्रीला मात्र प्रीत जागवतं,
विरागी घर, बेचैन होतं ॥४६॥

असं हे घर सदा सोबत देतं,
माझ्या मनातच वस्ती करतं
दुसऱ्या घरी जातानासुद्धा –
माझी पाठ सोडत नसतं ॥४७॥

मनात आपल्या घराची गर्दी सावरत –
कुठे कुणाकडे उगीच जायचे ?
पाठ न सोडणाऱ्या घराला,
एकटे कसे टाकायचे ? ॥४८॥

मीरेच्या एकतारीत सतार मिसळते
जोगीया, न् भैरवी एकरूप होते
वनवासी जीवाला निगुतीने जपते, घर
सारे दाह पोटाशी धरून ।।४९।।

घराने सूर जोपासलेले असतात,
प्रीतीचे न् भक्तीचे
घराने प्रार्थना केलेल्या असतात,
सारीपाटावरील माणसांसाठी ।।५०।।

ऊन, पाऊस, थंडी, वारा, वादळ
सहज सोसणारे घर –
माणसांसाठी अश्रू ढाळते
त्या अश्रूंनी माणसाच्या जीवनाचे सोने होते ।।५१।।

न बोलणारे, न हलणारे –
घर, माणसाचे सोबती असते.
माणसांनी माणसासाठी बांधलेल्या घरावर
घरच फक्त प्रेम करते ।।५२।।

□

## भाग दुसरा

# घर तुळशीचे

उंबरठ्यावर रांगोळी रेखत
अन् परसदारीचे अंगण जपत
वाढत असतेस तू –
अंगणातले एक रोप बनून ॥१॥

पाणी घालणारे, निगराणी करणे
सांगतात रोज – उतू नको । मातू नको
' फुलू नको, फार डोलूही नको ।
कुंडीची मर्यादा ओलांडू नकोस ' ॥२॥

तूही मान हलवून डोलतेस
कुंडीची मर्यादा समजून घेतेस
सांगतील तेवढीच वाढत असतेस
फुलारे आतल्या आत सावरत ! ॥३॥

तू असतेस अंगणामधली तुळसी
हळदकुंकू लावून देवत्व पावलेली –
सांज आरतीने तेजाळून गेलेली
अजाण प्राक्तनात ! ॥४॥

अंगणभर असतो धुमाकूळ
पोरांचा, चिमण्यांचा, माणसांचा –
तुलाही आतून कोंभ फुटतात
बंदिस्त चौकटीत ! ॥५॥

तू बैरागन, ध्यानस्त, संयमी
सांगितलेले मंत्र जपत
रोज ऐकत असतेस कथा
तुझ्या खऱ्या घराच्या ॥६॥

'हे रोप तर आहे परघरीचे
काही काळच इथे आहे सजायचे
ही वास्तू हिची नाही कायमची
एक दिवस पाठवणी आहे करायची' ॥७॥

'या घरात का नाही राहायचं ?
परक्या घरी कशासाठी जायचं ?'
मर्यादा पाळते, धुमारे गोठवते
प्रश्नांचे कोडे तसेच ! ॥८॥

रात्री अपरात्री लाख चांदण्या येतात
आभाळभर पिंगा घालून तुला सादवतात
निळ्या निळ्या पऱ्या फेर धरतात
बंदिस्त, तटबंदी सभोती ।।९।।

झाडा-माडांचे उंच माथे
हलतात, डोलतात, तुला जागवतात
वसंत येतो न् मोहोर उमलतो
तुझ्या कानात एक मंत्र देतो ।।१०।।

पऱ्ह्यातलं पाणी मासोळीवाणी
खळखळत जाताना गात असतं गाणी
तुझ्या मनात डोलते फुलराणी
धुमाऱ्यांना गंधवाणी ।।११।।

आभाळाला भिडावं, झाडांशी बोलावं,
वसंतात न्हावं, फुलात मिटावं,
पाण्यासंगं गावं, बेभान व्हावं
रंग–गंधातले एक स्वप्न ।।१२।।

हे सारं तू म्हणत असतेस
स्वप्न पंख उभारून मोरणी फुलते
बंदिस्त मर्यादेत जन्म घेते
भावविभोर स्वप्न ! ।।१३।।

शेजारच्या आंब्यावर कोकिळा येते
वसंताची, फुलांची चाहूल देते
बुलबुल, साळुंख्या गाताना पेरतात मनात
मेंदीच्या पानाएवढे स्वप्न ! ।।१४।।

स्वप्नांना कधी मर्यादा नसते
अन् शोकांतिका मान्य नसते
फुलायचं नाही, डोलायचं नाही
स्वप्न मात्र अमर्याद ! ।।१५।।

आभाळातून चांदणं मनात उतरतं
अलगद मोरपीस फिरवून जातं
आतले धुमारे फुटून उमलतं
देहावर लक्ष पाकळ्यांचं फूल ।।१६।।

सोनकिरणे सोनपावलांनी येतात
पाना-देठांवरून काळजात उतरतात
सोनकिरणे ल्यालेला, चांदणे प्यालेला
राजकुमार समोर उभा करतात ॥१७॥

आता मर्यादेचं भय नसतं. मात्र...
...राजकुमाराशी नजर मिळताच
घायाळ, थरथरतं मनाचं फूल !
लक्ष पाकळ्यांचं ! ॥१८॥

तो असा असावा, तसा असावा
रंगाने सावळा, मोरपिसांचा मुकुट ल्यावा
घोंगडी पांघरूनही तो यावा
नजरेतला घन निळा, रिता इथे व्हावा ॥१९॥

मी अशी बंदिस्त मर्यादेत वाढलेली
हळदकुंकू – सांज आरतीत जखडलेली
अमर्याद होणं मला जमणार नाही
प्रतीक्षा कधी सरणारही नाही ॥२०॥

...३

त्याची स्वप्ने, त्याची चित्रे
दिवाणी तुळस बनवतात
मातीचे काठ आता रुतू लागतात
अमर्यादेच्या तांडवात ! ॥२१॥

तो कधी येईल तेव्हा
पानांचो शेज सजवून
मंजिऱ्यांची शाल पांघरून
पापणीच्या आत अंगाई गाईन ॥२२॥

अंगणातून माणसे जाता–येता
तुला चकीत न्याहाळतात
तुझी नव्हाळी, तुझी कांती
मनातल्या मनातून चक्रावतात ॥२३॥

' हिला तर सादवलंय खुळचा पाखरानं
घेरून टाकलंय, सुसाट वाऱ्यानं
हिला इथंच ठेवलं तर सारंच मोडेल
नादावून उडाली तर मर्यादा तोडेल. '॥२४॥

‘ हिला आत्ताच हलवली पाहिजे
जिथल्या तिथं पोहोचवली पाहिजे
वासराला वेळीच दावण पाहिजे
फुललेल्या मंजिऱ्यांना कुंपण पाहिजे.’ ॥२५॥

ते सारे काही बाही बोलतात
तुझ्या जीवनाची कुंडली मांडतात
मागे–पुढे प्यादी सरकवतात
तुझ्या सारीपाटावरची ! ॥२६॥

तू खुळी भाबडी बावरी !
दिवाण्या स्वप्नात हरवलेली
तुला मुळी ऐकूच येत नाही
त्यांचा बेत तुझ्या गावीही नाही ॥२७॥

तुझ्या परीने तू सांभाळलेलं,
उतली नसतेस, मातली नसतेस
घेतला वसा पाळत असतेस
श्रद्धेनं, विश्वासानं ॥२८॥

तू वाट पाहत असतेस
स्वप्नीच्या राजकुमाराची
मंतरलेल्या क्षणांची, प्राजक्ताची, बकुळाची
मेंदीने रंगणाऱ्या दिवसाची ॥२९॥

'खरंच, तू कधी येशील का ?
जीवीचा विसावा होशील का ?
तू आलास तर सारे सुखावतील
कुरवंडून फुलांच्या पायघड्या घालतील. ॥३०॥

'हे घर, अंगण, माणसे माझी
बघतोस ना ? कशी प्रेम देतात ?
मायेनं जपतात – नजरेनं न्हाणवतात
म्हणून तर या मंजिऱ्या, लाल–हिरवी पाने !'॥३१॥

तारे–वारे डोलत असतात
कमळिणी उमलून मिटत असतात
ऋतू–मास बदलत असतात
तुझ्यापाशीच थबकत असतात ॥३२॥

अचानक सकाळी अंगण गजबजते
सनईच्या सुरांनी घर भरून जाते
हिरवी कांकणे, पिवळी साडी, फुलांच्या माळा
तुळशीचे लग्न – तुळशीचे लग्न ! ॥३३॥

‘ तुळशीचे लग्न ? माझे लग्न ?’
मनात अनामिक हुरहूर दाटते
‘ माझा राजकुमार यांना कुठे भेटला ?
माझ्या मनीचा तळ अचूक कसा जोखला ?’ ॥३४॥

मायेच्या माणसांसाठी मन झुरमुरते
त्याची सय मनात दाटते
विरहाच्या कल्पनेने सैरभैर होते
दिवाणे स्वप्न ! ॥३५॥

डोळ्यांमधल्या पाण्यात निरोप विरघळतो
रिकाम्या कुडीत प्राण अडखळतो
तरीही त्याचा स्पर्श सुखावतो
आरसपानांचा, मोरपिसांचा ॥३६॥

‘ सावधान ’च्या इशाऱ्याने बेसावध असतेस
अंतरपाटापल्याड बघतच नसतेस
‘ तो ’ तोच असणार
खालमानेने वरमाला गळ्यात येते ।।३७।।

हळदीच्या अंगानं, मेंदीच्या रंगानं
पावलं घरभर अडखळत असतात
फुलांतली, ताऱ्यांतली, मनातली लय
नाजूक ताल देत असतात ।।३८।।

पाकळी पाकळी उलगडताना
मिठी दिठी जुळावी
कांचनाच्या तनुसभोवती
चंद्रकांती आभा यावी ।।३९।।

तुला भानच नसते वास्तवाचे
कुंकवाखाली लपलेल्या अटळ प्राक्तनाचे
एका अवघड क्षणी समजून येते
तुला हवे होते ते … ‘ हे ’ नव्हते ।।४०।।

तुझ्या स्वप्नीचा राजकुमार हा नव्हता
जो समोर उभा तो तुझा नव्हता
मेंदीच्या पानाला नागाचा विळखा
पानांवरचा मोर घुसमटलेला ॥४१॥

तुझा तर राणी घात झाला होता
राजकुमार कुणी शोधलाच नव्हता
समोरच्या कठोर प्राक्तनाशी –
तुझा डाव मांडला होता ॥४२॥

पानांची शेज, मंजिरी शेला –
सारं कुठं हरवलंच होतं
अटळ सत्य मात्र –
समोर भेसूर उभं होतं ॥४३॥

मी उतले नाही, मातले नाही
घेतला वसा टाकला नाही
मग असं कसं भोगणं होतं ?
डोळयांतलं पाणी तटस्थ ! ॥४४॥

ती स्वप्ने चांदण–गोंदणाची
अन् रात्र लखलखत्या ताऱ्यांची
सारा मांड चारी वाटा उधळून
दाट मिठी काळोखाची ! ॥४५॥

त्या घरची, या घरची माणसे,
सारीच कशी उलटया मनाची ?
काल होते तुळशी, आज कोरांटी
या जगाची रीतच कशी उफराटी ! ॥४६॥

राजकुमारासाठी तापत्या उन्हात करपले
लक्षवातींनी सिंहासन पुजले
सारे कसे विझू विझून गेले
केसातले गजरे सैरभैर ! ॥४७॥

तुझ्या गाण्यांतून आळवायची होती तुला
आभाळाची धून, समुद्राचं गाणं
निळ्या पंखांची नाजूक फडफड
टिपायची होती पापणीत ॥४८॥

आंब्याच्या मोहोराचं, पारिजाताचं, बकुळीचं
पापणीत लपलेलं स्वप्न
फिकं फिकं होत वाहू लागतं
गालावरून टपटपत, धरतीत विरतं ।।४९।।

तू सैरभर चकित बावरी
बघतेस आजूबाजूचा गदारोळ अन्
शोधत राहतेस कुठेतरी
माणुसकीचा झरा ! ।।५०।।

त्या घराला मुळी अंगणच नसते
नसते परसदार, मेंदी
निवडुंगाचे फडे ओके, रखरखीत
लाल बोंडे सभोवती ।।५१।।

आभाळातल्या चांदण्या आभाळभर शोधतात
तुझे हरवलेले स्वप्न !
आंब्याचा मोहोर, कोकिळेचा साद मुका होता
तुळसकाठी बघून ! ।।५२।।



...४

त्यांनीच पेरले होते मोरपंखी स्वप्न –
त्या डोळ्यांच्या काचा बघून –
आभाळ काळीज फुटून रडू लागतं
कोरड्या तुळशीला सावरत असतं ।।५३।।

एक एक पाकळी शोधून शोधून
गजरा गुंफत असतेस,
चिंधी चिंधी जोडत जोडत
मंजिरी शेल्याला ठिगळत असतेस ! ।।५४।।

मनाचे छिन्नभिन्न तुकडे
इथे तिथे दीनवाणे, बापूडवाणे
यांच घरात यानंतरही
जगणे किंवा मरणे ! ।।५५।।

मुकी कळी मग फुलतच नाही
डोळ्यांतून चांदणं झिरपत नाही
ओठांवर गीत उमटत नाही
स्वप्नाच्या घोरानं पाखरू खंतावतं ! ।।५६।।

त्याची नशा संपवणारी असते
भोगता भोगून संपत नसते
चावून, ओरबाडून चोथा होते
दिठी, पाने, देठ. ॥५७॥

त्याला हवे रोज नवे धुमारणारे फूल,
वखवखीत वासनेचे जळते खंदक
जिवंत मरण भोगून भोगून
रिकामा होतो पिंजरा ! ॥५८॥

नव्या पाखरामागे तो खुळावतो
तुझ्यामधला रस आता संपलेला असतो
सुखदुःखाच्या पलीकडे तुझे
जीवन निःस्तब्ध ! ॥५९॥

अंगावरचे वळ पदराआड लपवतेस,
डोळ्यांतले पाणी गिळून टाकतेस
मारझोड तनमनाचो सोसता सोसता
शोधतेस उत्तरे अनेक प्रश्नांची ! ॥६०॥

‘ हे सारं असंच का असायचं ?
जग हसताना, मी का रडायचं ? ’
छिन्न, भिन्न काळोखातले –
अनेक प्रश्न, नागासारखे ! ॥६१॥

तू तर असतेस खुळी बावरी
अजाणता, अर्थहीन जन्म घेतलेली
प्राक्तन भोगणारी –
तू एक स्त्री ! ॥६२॥

तुझे स्वतःचे कधी घरच नसते
तरी उंबरठा, चौकट तू जपायची असते
धुणी, भांडी, दळण, कांडण
साऱ्यांनी तुझेच घातलेले ! ॥६३॥

सत्य तुला समजून येते
पारोसे जीवन रडवत असते
भोगवट्याचं ओझं बाळगत असते
न संपणारे रहाटगाडगे ! ॥६४॥

सारं सारं सोसायचं असतं
कुठंच काही बोलायचं नसतं
उतायचं नसतं, मातायचं नसतं
यालाच संस्कृती म्हणायचं असतं ॥६५॥

चुलीतल्या लाकडानं चुलीत जळावं
स्वतःच्या पोतेऱ्याचं पोतेरं व्हावं
अंगण सारवणं, वाळवण बघणं
घट्ट ओठांनी ! ॥६६॥

आया बाया बापड्या साऱ्या
असंच सांगत, जगत असतात
तुलाही तोच कानमंत्र देतात
लाकूड लाकडाला चुलीत ढकलताना ! ॥६७॥

वाट दाखवणारं कुणीच नसतं
बोलायला मात्र गाव असतं
राजकुमाराचं सरतं स्वप्न
पाखराला घुसमटतं ! ॥६८॥

तुला दिसत नसतात चंद्र-सूर्य
नदीतली मासोळी, बकुळीचा बहर
भातुकलीचा डाव, रानफुलांचे गजरे
काकणांचा, पाखरांचा सूर हरवलेला ! ॥६९॥

सारंच तुला अनोखं वाटतं
मागचं गाव मागंच उरतं
नजरेसमोर आता गावच नसतं
दिशाहीन अस्तित्व ! ॥७०॥

सभोतालीच्या चिता तू बघत असतेस
अगतिकपणे, रडणाऱ्या-जळणाऱ्या
नियतीला मुकाट सामोरं जाणाऱ्या
एकाच नावेतल्या सरण्या ! ॥७१॥

थिजलेल्या नजरेला रोज दिसतात,
गळफास लावणाऱ्या, दुरपदा-परबता
जाळून घेणाऱ्या रूपा अन् सीता
जळालेल्या रेखा-संगीता-कविता ! ॥७२॥

सासुरवासाने हडपलेल्या, वासनेने करपलेल्या
पांढऱ्या कपाळावर तप्त मुद्रा –
अंगावरच्या चिंध्या सावरणाऱ्या
अनेक पोरी, प्रौढा, किशोरी ॥७३॥

चिंधी चिंधीने भळभळती जखम
पुसत मनाच्या जखमेवर उतारा शोधत
भिंतींशी, प्राक्तनाशी टक्कर घेणाऱ्या
अनेक अनेक कवितांच्या वेदना ! ॥७४॥

कुणाचा सजण परदेशी
जिता की मेला माहीत नसतो
गाव सारा बोलता असतो
बेवारशी धावा सुरूच असतो ॥७५॥

शेतातून, रानातून, पाणवठ्यातून
बसमधून, लोकलमधून, ट्रकमधून
धगधगती पलाशफुले धावत असतात
रक्तमाखली पावलं इथं-तिथं ! ॥७६॥

लांडग्यांच्या नजरा, कोल्ह्यांच्या जिभा
सापाचा डूख, गेंड्याचं कातडं
सारं सभोवती उभं असतं
हरीण काळीज लकलकत असतं ।।७७।।

सत्य तुला फार उशीरा उमगतं
एका कडेकोट परिघात –
शिळा होऊन पडण्याचा शाप उभा असतो
उःशापाची वाट बघत ! ।।७८।।

कुठेतरी गल्लत, गफलत अज्ञातात
फार मोठी झालेली फसगत
सोज्वळ चेहरे – पवित्र शब्द
प्रश्नांसोबत, अर्थाचा शोध ! ।।७९।।

तू तुळसी, तू सीता, द्रौपदीही तूच
भोग तूच अन् भोगवटाही
होम तू, हव्यही तूच
संस्कृती तूच अन् संस्कारही ! ।।८०।।

सारं ओझं तुझ्या खांद्यावर –
जग मात्र मोकळं ढाकळं –
कुणी कसंही वागावं अन्
खापर तुझ्या माथ्यावर द्यावं ! ॥८१॥

यासाठीच तर तुझा जन्म होता
सर्वांना निमित्त टेकायला हक्क होता –
टाकून गेलेला ' बिचारा ' होता
तू पापांची धनीण ! ॥८२॥

देवता म्हणून पुजताना, सांजआरती करताना
तुझी फसगत होत होती
मंजिरीएवढ्या स्वप्नाची घोर शोकान्तिका,
पाळे, मुळे हादरत होती ! ॥८३॥

तू तर भोगलास वनवास – स्त्रीजातीचा
सीतेचा, द्रौपदीचा, तारामतीचा
वनवास तेवढाच नशिबी होता
राजप्रासाद कधी भेटलाच नव्हता ॥८४॥

तुला हवं होतं कवितांच्या भिंतींचं – एक –
चंद्रमौळी खोपटं, ढगांच्या गाद्या–उशा –
सावरीचा कापूस हवा होता घरभर
राजकुमारासाठी – ।।८५।।

झोपाळ्यावर झुलायचं स्वप्न
किती साधं होतं ! गुलबकावलीचं फूल कुठं मागितलं होतं ?
सारीपाटावर, काचापाणी, साई सुट्यो
गजग्याच्या डावातच रंगायचं होतं ।।८६।।

स्त्री जातीची रीत अशी का असावी ?
जात्यावरच्या दळणात, तीच भरडून जावी ?
साऱ्या साऱ्यांचा उबग येतो
डोळ्यांमधल्या काचांना दृष्टिभ्रम होतो ।।८७।।

त्या भ्रमात जन्माची, ओठांची मिठी सुटते
न बोलणारे शब्द बोलू लागते
' मला आरती नको, धुपारती कशासाठी ?
उगाचच देवत्वाचे लेणे ! ।।८८।।

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२६८२३
२६४३०
१५५५९
संदर्भ शाखा

माणूस म्हणून जगू द्या –
मोकळा श्वास फुलू द्या –
तुमच्याच शब्दांचे अनंत नाद –
अखंड मी ऐकत आले ॥८९॥

मला जे बोलायचे तेच,
मुळी हरवून गेले !
माझेही एक आक्रंदन, स्पंदन आहे –
कुणी न ऐकलेले.' ॥९०॥

तुळसी बिचारी ! एकटीच बोलते
ना भान आकाशाचे, धरतीचे
कोरड्या पडलेल्या मातीचे
झडून झडून सुकणाऱ्या अंगकाठीचे ! ॥९१॥

भावविभोर तुळशीची शुष्क काठी
उंच उंच आभाळावर माथा टेकवत
बोलत असते, एकटीच, तिचे तिलाच
काही समजत नसते ॥९२॥

अंग सोडून झुरमुरणाऱ्या कुशीत
इवलेसे रोप हळूच अस्तित्वाचा धक्का देते
‘ ही तर माझीच प्रतिकृती
भोगवटयातून आकार घेतलेली माझी आकृती ॥९३॥

भोगलेले क्षण वांझ नव्हते
शरीराने नाकारलेले निसर्गाने साधले होते
मला समजले नाही तरी,
माझे सोनुले रडत होते. ’ ॥९४॥

लाल तांबूस पानांचे
इवलेसे रोप, नाजूकसे हसते
त्याला बघून तुळशी खुळावते
किती वर्षांनी, युगांनी ! ॥९५॥

तुला राणी, मी कशी विसरले ?
आपल्या दुःखाने आसमंत भरले
नजरेच्या काचा पाझरता पाझरता
इवलेसे रोप कुशीत शिरले ! ॥९६॥

त्या सानुल्या स्पर्शाने गाणी फुलतात
काचापाण्याची, झिम्मा फुगडीची, झोपाळ्याची
सारवलेल्या अंगणाची, कवडशांची
मनातून, तनातून गाणीच गाणी आभाळधुनीची ! ॥९७॥

‘ माझा तर राणी, चिखलच झाला –
कुठलाही आकार हातीच नाही आला
मी भोगेन सारा सासुरवास –
तुझ्या सुखासाठी ! ’ ॥९८॥

बघता बघता तुळसकाठी पाझरते
कोरडी माती सैलावत जाते
तुळसकाठी जगणार असते, जगवणार असते
चिमण्या पाखराला ! ॥९९॥

‘पालवी आली, तुळसकाठी फुलली ’
घरादारांतून आरोळी उठली
‘ म्हातारीत पुन्हा रंग भरलाय
संपता संपता वसंत फुललाय ! ’ ॥१००॥

तिला स्वत:चंच कोडं पडतं
मरता मरता माणूस का जगतं ?
भोगवटे भोगूनसुद्धा माणूस –
जिवंत मरण कसं भोगतं ? ॥१०१॥

तिला अर्थ समजतच नसतो
नव्या बदलाचा, ओलाव्याचा
हा ओलावा आला कुठून ?
स्पर्शात चंदन उमटलं कसं ? ॥१०२॥

अचानक येतो आठव राजकुमाराचा !
गंधगाभाऱ्यात जपलेल्या मोरपिसाचा
पापणीतून वाहून धरतीत विरलेल्या त्या,
अस्पर्शित स्वप्नांचा ॥१०३॥

तो प्रीतिगंध आत आत होता
त्याच्यावरच तर डोलारा उभा होता
सोसण्याचा आधार होता
केव्हापासूनचा ! ॥१०४॥

म्हणून तर स्वप्नांची कलेवरं लटकणारे
झाड पुन्हा फुलते, खोड तिथेच उरते
त्याला उमाळा देणारा
प्रीतिगंध, चिरंतन ! ॥१०५॥

राजकुमार कधी आलाच नव्हता –
मधला डंख पचवला होता
ग्रीष्मात गुलमोहोर फुलणार होता
पलाश फुलांना सावर पांघरत ॥१०६॥

मी तुळशी, धरतीची कन्या
तापून, झोडपून, तडकून, सुकून
पुन्हा पुन्हा जळणारी, फुलणारी
नव्या रोपासाठी ! ॥१०७॥

हजारो तुळशी अशाच जगतील
बदलत्या युगाची वाट बघत
एखाद्या रोपाचा वृक्ष होईल
पोलादी, कणखर ! ॥१०८॥

एखाद्या तुळशीला भेटेल राजकुमार
तडीपार नेणारा, घोड्यावरून !
एखादी तुळशी आकार घेईल
विश्वव्यापी ! ॥१०९॥

दा. क्र. २६८२३
२६४३०

हजारो तुळशी वठून पुन्हा फुलतात
कुशीतल्या रोपाला फुलविण्यासाठी !
तुळशी आता सावध असते
प्रत्येक क्षणी, रोपासाठी ! ॥११०॥

‘ हिला फुलू दे, गाऊ दे
लक्ष पाकळ्यांनी उमलू दे
हिच्या मनीचे स्वप्न भिडू दे
निळ्या आभाळाशी !’ ॥१११॥

म्हणून स्वप्नांची कलेवरं लटकणारे
झाड पुन्हा फुलते – मनाच्या उमाळ्यावर
तापून–रापून–तडकून, सुकूनही फुलते
मनातली जिप्सी ! ॥११२॥

प्रत्येक अंगणात तुळशी असते
सासुरवाशिणीला कहाणी देते
उ:शापाची, जगण्याची, फुलण्याची
स्वत:साठी, रोपासाठी ॥११३॥

तिच्या भोगलेल्या वेदनांचे होते मग
आभाळफूल !
डोळ्यांत अनोखे स्वप्न असते
तिच्या घराचे, नव्या युगाचे ! ॥११४॥

□

REFBK-0026430
REFBK-0026430